**<u>ठळक बातम्या</u>**

- माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांची शंभरावी जयंती सुशासनाची प्रेरणा देणारी असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन,

- केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते दहा हजारापेक्षा जास्त कृषी संघटनांचं लोकार्पण,

- नक्षलवादाविरोधात शर्थीची लढाई करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला निर्धार

**आणि**

- आयसीसी कसोटी गोलंदाजी क्रमवारीत जसप्रीत बुमराह अग्रस्थानी, रविचंद्रन अश्विनच्या कामगिरीशी केली बरोबरी.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांची आजची शतकमहोत्सवी जयंती आपणा सर्वांसाठी सुशासनाची प्रेरणा घेण्याचा दिवस आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मध्य प्रदेशातल्या खजुराहो इथं देशातल्या पहिल्या, महत्त्वाकांक्षी आणि बहुद्देशीय केन-बेटवा राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाची पायाभरणी आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाली, त्यावेळी ते बोलत होते. देशातल्या पहिल्या, ओंकारेश्वर तरंगत्या सौरऊर्जा प्रकल्पाचं लोकार्पण, तसंच १ हजार १५३ अटल ग्राम सुशासन भवनांचं भूमिपूजनही मोदी यांनी यावेळी केलं. याशिवाय, वाजपेयींच्या स्मरणार्थ एक विशेष टपाल तिकीट आणि नाण्याचं प्रकाशनही त्यांच्या हस्ते झालं. दिवंगत अटल बिहारी वाजपेयी नेहमीच सुशासनाचा प्रेरणास्त्रोत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले,

***बाईटः प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

गेल्या दशकात देशभरात जलसुरक्षा आणि जलसंवर्धन या क्षेत्रात ऐतिहासिक काम झाल्याचं मोदी यांनी नमूद केलं. याआधीच्या सरकारांनी या क्षेत्राकडे दुर्लक्ष केल्याचं सांगून देशाच्या जलस्रोतांचा विकास करण्याचं धोरण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आखलं, असं मोदी यांनी सांगितलं. मध्य प्रदेशचे राज्यपाल मांगूभाई पटेल, मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पटेल यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांची शतकमहोत्सवी जयंती आज साजरी झाली. या निमित्तानं दिल्लीत ‘सदैव अटल’ या त्यांच्या समाधीस्थळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पुष्पांजली अर्पण करून, अटलजींच्या स्मृतींना अभिवादन केलं. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, अटलजींच्या दत्तक कन्या नमिता भट्टाचार्य यांच्यासह इतर यावेळी उपस्थित होते. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज मुंबईत राजभवन इथं अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. राज्यात इतरत्रही वाजपेयी यांना विविध कार्यक्रमातून आदरांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती आणि नाताळच्या जन्मदिनाचं औचित्य साधून फिनिक्स फाउंडेशन संस्थेनं आजपासून बांबूचे पर्यावरणस्नेही ब्रश, कंगवे आणि शेविंग किटचं उत्पादन लातूर जिल्ह्यात लोदगा इथं सुरू केलं. संस्थेचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी ही माहिती दिली. पर्यावरणस्नेही बांबूच्या वापरामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होणार असून अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असं संस्थेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या नवी दिल्ली इथं विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १७ मुलांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बालपुरस्कारानं गौरवणार आहेत. कला आणि संस्कृती, शौर्य, नवोन्मेष, विज्ञान आणि तंत्रज्ञान, समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण या क्षेत्रांमध्ये हे पुरस्कार दिले जातील. पदक, प्रमाणपत्र आणि सन्मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्लीच्या भारत मंडपम इथं वीर बाल दिवस या कार्यक्रमाला संबोधित करतील. 'सुपोषित ग्राम पंचायत अभियाना'चा प्रारंभही ते करणार आहेत. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांचे विजेतेही या कार्यक्रमाला हजेरी लावणार आहेत.

<><><><><>

केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्लीमध्ये पुसा इथं नव्यानं स्थापन झालेल्या दहा हजारापेक्षा जास्त बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचं लोकार्पण केलं. यावेळी त्यांनी या संस्थांना नोंदणी प्रमाणपत्रं, रुपे किसान क्रेडिट कार्ड आणि मायक्रो एटीएमचं वितरणही केलं. पंचायतींमध्ये कर्जाची सेवा सहज उपलब्ध करून देण्यासाठी आणि आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन देण्यासाठी ही आर्थिक साधनं तयार करण्यात आली आहेत. देशाच्या ग्रामीण भागातल्या जनतेला विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आणि देशाच्या आर्थिक प्रगतीत सहभागी होण्यासाठी ती उपयोगी ठरतील.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज नवी दिल्लीतल्या सीआरपीएफ अर्थात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या मुख्यालयात सीआरपीएफचं काम आणि प्रशासकीय कार्यक्षमतेचा समावेशक आढावा घेतला. देशात अंतर्गत सुरक्षा आणि शांतता राखण्यात सीआरपीएफ महत्वाची भूमिका बजावत असल्याचं ते यावेळी

म्हणाले. नक्षलवादाचा सामना करण्यात, तसंच ईशान्येकडची राज्यं आणि जम्मू आणि काश्मीरमध्ये शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यात केंद्रीय सशस्त्र निमलष्करी दलानं प्रशंसनीय काम केल्याचं शहा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नक्षलवादाविरोधात शर्थीची लढाई करण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते आज नागपूर इथं एका पत्रकार परिषदेत बोलत होते. गडचिरोली ही भारताची दुसरी स्टील सिटी होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. आपल्या मागच्या कार्यकाळात आपण विदर्भात सिंचनाचे ८० प्रकल्प पूर्ण केले, याशिवाय पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, कोकण, उत्तर महाराष्ट्रातले प्रकल्पही पूर्णत्वाला नेले. ऊर्जा विभागाचे मंत्री म्हणून त्या क्षेत्रातला पुढच्या पंचवीस वर्षांची आखणी तयार आहे, असंही त्यांनी सांगितलं. पुढच्या दोन वर्षांत सर्वच प्रकारच्या विजेचे दर कमी करता येतील, अशी व्यवस्था निर्माण करण्यावर आपला भर असल्याची माहिती त्यांनी दिली.

**होल्ड बाईट......**

हा नदीजोड प्रकल्पांमुळे महाराष्ट्राचा कायापालट होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हमीभावासंदर्भात इतर राज्यांच्या धोरणाचा अभ्यास केला जाईल असं सांगून कापूस आणि सोयाबीन यासह अन्य पिकांच्या खरेदीत सुलभता आणण्याचा सरकारचा विचार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

आयसीसी पुरुष कसोटी गोलंदाजी क्रमवारीत भारताचा आघाडीचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह यानं ९०४ गुणांसह पहिलं स्थान मिळवलं आहे. यासोबतच त्यानं कोणत्याही भारतीय गोलंदाजाने मिळवलेल्या सर्वाधिक गुणांच्या विक्रमात फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनच्या विक्रमाशी बरोबरी केली. ब्रिस्बेन कसोटीत ९४ धावांच्या मोबदल्यात ९ गडी टिपण्याच्या कामगिरीमुळे बुमराहनं १४

गुण मिळवून पहिलं स्थान कायम राखलं आहे. उद्यापासून सुरू होणाऱ्या मेलबर्न कसोटीत हा विक्रम मोडण्याची संधीही बुमराहला मिळणार आहे.

<><><><><>

देशभरात आज नाताळचा सण मोठ्या उत्साहात साजरा झाला. गोव्यामध्ये भक्तिपूर्ण वातावरणात नागरिकांनी ख्रिस्तजन्माच्या उत्सवाचा आनंद घेतला. दोडोल, केक, बेबिंका यांसारख्या स्वादिष्ट पदार्थांनी दुकानं फुलून गेली होती. मुंबईत ख्रिस्ती बांधवांनी विविध प्रार्थनागृहांमधे भक्तिमय वातावरणात येशू ख्रिस्ताचा जन्म सोहळा साजरा केला. नाताळ निमित्त शहरात आणि ख्रिस्ती वस्त्यांमध्ये सजवलेले ख्रिसमस ट्री आणि येशू ख्रिस्ताच्या जन्माचे देखावे उभारण्यात आले होते. राज्याच्या इतर भागांतही ख्रिसमस मोठ्या उत्साहात साजरा झाला.

<><><><><>

मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात आज काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय, तर कोकण आणि मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी किंचित वाढ झाली आहे.

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून विदर्भात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

येत्या २७ आणि २८ डिसेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज घेऊन शेतीच्या कामाचं नियोजन करावं असं आवाहन हवामान विभागानं केलं आहे.

//<><><><><>//